
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। बुधवार, दि. १ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ८४ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

यूपीएससी तयारीसाठी ७५ हजारांपर्यंत अर्थसाहाय्य!
(पान २ वर)



## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात विधानभवनावर विराट महामोर्चा

# 'जय भीम'च्या घोषणांनी मुंबई दणाणली!

## आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हजारोंचा एल्गार; २७ आमदारांचाही प्रस्तावाला विरोध

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात राज्यभरातील विविध समाजबांधवांनी मुंबईत अभूतपूर्व शक्तिप्रदर्शन करत विधानभवनावर विराट महामोर्चा काढला. "जय भीम!", "संविधान जिंदाबाद!" आणि "हम सब एक है!" या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात हजारो आंदोलक सहभागी झाले होते. संविधान, सामाजिक ऐक्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या संरक्षणासाठी हा लढा असल्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला.**

- पवर्गीकरणाविरोधात संविधान बचावाचा एल्गार •
- "संविधान जिंदाबाद", "हम सब एक है"च्या घोषणांनी मुंबई दुमदुमली
- * २७ आमदारांनी मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन
- * बदर समितीच्या अहवालावरून नवा वाद



मुंबईतील मेट्रो सर्कल ते आझाद मैदान मार्गे निघालेल्या या महामोर्चाने विधानभवनाच्या दिशेने कूच केली. या मोर्चाचे नेतृत्व आनंदराज आंबेडकर, भीमराव आंबेडकर यांच्यासह विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले. आंदोलकांनी हातात संविधानाच्या प्रती, निळे झेंडे आणि विविध मागण्यांचे फलक घेऊन शांततापूर्ण पण आक्रमक पद्धतीने शासनाचे लक्ष वेधले. मोर्चादरम्यान आंदोलकांनी उपवर्गीकरणाचा प्रस्ताव हा अनुसूचित जातींमध्ये फूट पाडणारा असल्याचा आरोप केला. संविधानाने दिलेल्या समानतेच्या तत्त्वाला धक्का पोहोचवणारा कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. विशेष म्हणजे, या आंदोलनात केवळ एका समाजाचा नव्हे तर चर्मकार समाजासह विविध अनुसूचित जातीतील घटकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. दरम्यान, अनुसूचित जाती प्रवर्गातील २७ आमदारांनी देखील या प्रस्तावाला स्पष्ट विरोध दर्शवला आहे. दोन मंत्र्यांसह आमदारांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन स्वाक्षरीयुक्त निवेदन सादर केले. उपवर्गीकरणाचा प्रस्ताव संविधानाच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात असल्याचा दावा करत, कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व समाजघटकांशी व्यापक चर्चा करावी आणि सामाजिक सलोखा अबाधित ठेवावा, अशी मागणी त्यांनी केली. उपवर्गीकरणाचा अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्या. अनंत बदर समितीच्या अहवालावरून देखील वाद निर्माण झाला आहे. समितीचा अहवाल सार्वजनिक न करताच त्यावर सूचना आणि हरकती मागविण्यात आल्याने विविध सामाजिक संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप करत, अहवाल तातडीने सार्वजनिक करण्याची मागणी आंदोलकांनी केली. दरम्यान, बार्टी (BARTI) कडे प्राप्त झालेल्या सुमारे ८० हजार सूचना व हरकतींपैकी ८५ टक्क्यांहून अधिक नागरिकांनी उपवर्गीकरणाला विरोध दर्शविल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. त्यामुळे या प्रस्तावाविरोधातील जनभावना अधिक तीव्र झाल्याचे चित्र समोर आले आहे. या वाढत्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात भूमिका स्पष्ट करत, उपवर्गीकरणाबाबत कोणतीही एकतर्फी कारवाई केली जाणार नाही, असे आश्वासन दिले. सर्व संबंधित समाजघटक, लोकप्रतिनिधी आणि तज्ज्ञांशी सविस्तर चर्चा करून, व्यापक सहमतीनंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. मुंबईतील या विराट महामोर्चामुळे अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा प्रश्न पुन्हा एकदा राज्याच्या राजकीय आणि सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला असून, शासन पुढे कोणती भूमिका घेते याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.



## अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणावर कायदा आणू नका


**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी :** अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारने कोणतेही विधेयक आणू नये, अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करून त्यावर सर्व संबंधित घटकांशी व्यापक चर्चा झाल्यानंतरच पुढील निर्णय घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले. मुंबईत आज अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात मोठा मोर्चा काढण्यात आला. या पार्श्वभूमीवर वडेट्टीवार यांनी सरकारला सावध भूमिका घेण्याचे आवाहन केले.

वडेट्टीवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेच्या माध्यमातून अनुसूचित जातींतील शोषित, वंचित आणि पीडित समाजाला आरक्षणाचा घटनात्मक अधिकार दिला. या आरक्षणामध्ये ५८ जातींचा समावेश असून, उपवर्गीकरणाच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचा कोणताही प्रयत्न घातक ठरेल. ते पुढे म्हणाले की, लाखो समाजबांधव रस्त्यावर उतरून उपवर्गीकरणाला विरोध करत आहेत. अशा परिस्थितीत सरकारने घाईघाईने कोणताही निर्णय घेऊ नये. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नाही. अहवाल प्रसिद्ध न करता त्यावर हरकती आणि सूचना मागविणे हे पारदर्शकतेच्या तत्त्वाच्या विरोधात असल्याची टीकाही त्यांनी केली. अनुसूचित जातींमधील आरक्षणाचा लाभ घटनात्मक तरतुदी आणि गुणवत्तेच्या आधारे दिला जातो. ५८ जातींमध्ये भेद निर्माण करून दलित समाजाला एकमेकांसमोर उभे करणे योग्य नसल्याचे वडेट्टीवार यांनी नमूद केले. अशा संवेदनशील विषयावर समाजातील सर्व घटकांची मते जाणून घेतल्यानंतरच सरकारने निर्णय घ्यावा, अशी त्यांची भूमिका आहे.

## कुंभमेळ्यासाठी ३४ हजार कोटींचा विकासनिधी

**जन सम्राट टाईम्स**



**मुंबई | प्रतिनिधी :** नाशिक येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यासाठी आवश्यक विकासकामे वेळेत पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असून कोणत्याही कामाला निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. कुंभमेळ्यासाठी केंद्र व राज्य शासनासह विविध यंत्रणांमार्फत एकूण ३४ हजार ७३२.३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून आवश्यक निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. नाशिक कुंभमेळ्यासाठी विविध विकासकामांना सविस्तर प्रकल्प अहवालअभावी प्रशासकीय मंजुरी दिल्याबाबत सदस्य सत्यजित तांबे यांनी प्रश्न उपस्थित केला. यावेळी सदस्य पंकज भुजबळ यांनीही चर्चेत सहभाग घेतला. कुंभमेळ्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीला आवश्यकतेनुसार कामांमध्ये बदल करणे तसेच नवीन कामांचा समावेश करण्याचे अधिकार देण्यात आले असल्याने या कामांसाठी स्वतंत्र प्रकल्प आराखड्याची आवश्यकता नसल्याचेही मंत्री सामंत यांनी यावेळी नमूद केले. रस्ते रुंदीकरण व नवीन रस्त्यांच्या ३६ कामांपैकी सुमारे ४० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. २५ गावांमधील ४०६.१९ हेक्टर जमीन संपादित करण्याचे नियोजन असून त्यापैकी ३५.२४ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. यासाठी ३५२.५७ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. खासगी जमीन संपादनासाठी ३,६५९.४७ कोटी रुपये आणि रिंग रोडसाठी ३,९५४ कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.ऑक्टोबरपासून कुंभमेळ्याच्या प्रारंभिक कार्यक्रमांना सुरुवात होणार असल्याने विकासकामे एकाचवेळी सुरू आहेत. मात्र, वाहतुकीत अडथळा निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या जातील, असे मंत्री सामंत यांनी सांगितले. तसेच, सदस्य सत्यजित तांबे यांनी सुचविल्याप्रमाणे लोकप्रतिनिधींची बैठक घेण्याबाबत कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्याशी चर्चा केली जाईल, असेही मंत्री सामंत यांनी नमूद केले.नाशिक येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यासाठी आवश्यक विकासकामे वेळेत पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असून कोणत्याही कामाला निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. कुंभमेळ्यासाठी केंद्र व राज्य शासनासह विविध यंत्रणांमार्फत एकूण ३४ हजार ७३२.३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून आवश्यक निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. नाशिक कुंभमेळ्यासाठी विविध विकासकामांना सविस्तर प्रकल्प अहवालअभावी प्रशासकीय मंजुरी दिल्याबाबत सदस्य सत्यजित तांबे यांनी प्रश्न उपस्थित केला. यावेळी सदस्य पंकज भुजबळ यांनीही चर्चेत सहभाग घेतला. कुंभमेळ्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीला आवश्यकतेनुसार कामांमध्ये बदल करणे तसेच नवीन कामांचा समावेश करण्याचे अधिकार देण्यात आले.

# वैद्यकीय शिक्षणात ऐतिहासिक बदल !

## २०२६-२७ नंतर 'हे' कोर्सेस होणार बंद




**जन सम्राट टाईम्स**

**शिंदखेडा | प्रतिनिधी :** देशातील वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात लवकरच एक अतिशय मोठा आणि ऐतिहासिक बदल पाहायला मिळणार आहे. नॅशनल मेडिकल कमिशन (NMC) ने एक अतिशय मोठा निर्णय घेत वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणात मोठे फेरबदल करण्याची घोषणा केली आहे. वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असलेले काही कोर्सेस लवकरच इतिहासजमा होणार आहेत.

पण हे नेमके कोणते कोर्सेस आहेत आणि विद्यार्थ्यांवर याचा काय परिणाम होईल, हे बघा.नॅशनल मेडिकल कमिशनने (NMC) नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या एका अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे की, देशातील सर्व 'पोस्ट ग्रॅज्युएट (PG) डिप्लोमा' (POSTGRADUATE DIPLOMA MEDICAL COURSES) अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद केले जाणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ हे या पदव्युत्तर डिप्लोमा अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचे शेवटचे वर्ष असेल. म्हणजेच २०२७-२८ या शैक्षणिक वर्षापासून देशात कोणत्याही पीजी डिप्लोमा कोर्सला प्रवेश दिला जाणार नाही आणि त्यानंतर हे कोर्सेस पूर्णपणे बंद होतील.जर पीजी डिप्लोमा कोर्सेस बंद झाले, तर जे विद्यार्थी स्पेशलायझेशन (विशेषीकरण) करू इच्छितात त्यांच्यासाठी कोणता पर्याय असेल? हा प्रश्न आहे.वैद्यकीय आयोगाने यावरअत्यंत सकारात्मक तोडगा काढत स्पष्ट केले आहे की, हे सर्व पीजी डिप्लोमा कोर्सेस टप्प्याटप्प्याने थेट पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांमध्ये, म्हणजेच 'MD' (DOCTOR OF MEDICINE) आणि 'MS' (MASTER OF SURGERY) मध्ये रूपांतरित केले जातील. याचाच अर्थ असा की, वैद्यकीय विद्यार्थ्यांना आता केवळ 'डिप्लोमा' धारक राहण्याऐवजी, थेट उच्च दर्जाची 'डिग्री' (DEGREE) मिळवण्याची संधी उपलब्ध होणार आहे.वैद्यकीय शिक्षणाचे धोरण ठरवणाऱ्या समितीने या निर्णयामागील भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते, वैद्यकीय शिक्षणाचे जागतिक स्तरावर मानकीकरण करणे, विशेषज्ञ प्रशिक्षणाचा दर्जा वाढवणे आणि सध्याच्या संस्थात्मक क्षमतेचा (इन्फ्रास्ट्रक्चर) पुरेपूर वापर करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. NMC च्या असे निदर्शनास आले होते की, अनेक वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एकाच विषयात पीजी डिप्लोमा आणि पीजी पदवी (MD/MS) असे दोन्ही अभ्यासक्रम एकाच वेळी चालवले जात आहेत. तर काही महाविद्यालयांकडे आवश्यक पायाभूत सुविधा, तज्ज्ञ प्राध्यापक आणि क्लिनिकल साहित्य उपलब्ध असूनही ते केवळ 'डिप्लोमा' कोर्सेस चालवत आहेत.या महत्त्वाच्या बदलाची अंमलबजावणी करण्यासाठी NMC ने सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि संस्थांना तातडीने निर्देश दिले आहेत. ज्या महाविद्यालयांमध्ये सध्या पीजी डिप्लोमा कोर्सेस सुरू आहेत आणि ज्यांना ते अभ्यासक्रम MD किंवा MS पदवीमध्ये रूपांतरित करायचे आहेत, त्यांनी 'मेडिकल असेसमेंट अँड रेटिंग बोर्ड' (MARB) कडे ऑनलाईन पोर्टलद्वारे विहित नमुन्यात लवकरात लवकर अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.हा बदल स्वागतार्ह आहे, असे मत सावंगी येथील दत्ता मेघे आयुर्विज्ञान अभिमत विद्यापीठाचे सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी व्यक्त केले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# “एकटा माणूस कसा जाऊ शकतो? संविधानाच्या शेड्युल 10 चं काय?

## अहिरांच्या बंडावर खासदार अरविंद सावंतांनी उपस्थित केले ४ प्रश्न

**जन सम्राट टाईम्स**




**नागपूर | प्रतिनिधी :** सचिन अहिर यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून विधानपरिषद उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केला. सहा खासदारांच्या फुटीनंतर आठ दिवसातच उद्धव ठाकरेंनी दुसरा धक्का बसला आहे. अहिर यांच्या फुटीनंतर ठाकरे गटाकडून विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी याप्रकरणी विविध प्रश्न उपस्थित केले आहेत. एकटा माणूस कसा जाऊ शकतो? संविधानातील शेड्युल १० चे काय? असे सवाल सावंत यांनी उपस्थित केले.“यांना बंडखोर कसं म्हणायचं? हे विकाऊ झाले, तुम्ही देशाच्या संविधानाला मानता का नाही? देशाच्या संविधानातील शेड्युल १० नुसार, एकटा माणूस कसा जाऊ शकतो?”, असा सवाल खासदार सावंत यांनी माध्यमांशी बोलताना उपस्थित केला. स्वेच्छेने पक्ष सोडणारे अपात्र व्हायला हवेत, असा मुद्दाही सावंत यांनी मांडला. कायद्याचे आणि मराठीचे विद्वान अध्यक्षांनी आमच्यावेळी काय केलं होतं? ते आता काय करतील? असे म्हणत नागरिकांनी देखील याचा विचार करण्याची गरज असल्याचे सावंत म्हणाले.१) लोकांनी विचार करायला हवा की हे संविधानाला कसे मानत नाहीत. २) एकटा माणूस कसा जाऊ शकतो? ३) तुम्ही पक्ष शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) लिहिता ना? मग संविधानातील शेड्युल १० चे काय? ४) मराठी प्रमाणेच संविधान तरतुदींमध्ये विद्वान असलेले अध्यक्ष हे देखील योग्यच म्हणणार का?“मला निवडून देखील आणा आणि उपसभापती देखील करा, हा सौदा आहे”, असा आरोपही खासदार सावंतांनी केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षावर निवडून आलेले आहात, त्याच चिन्हावर तिकडे गेले आहात, मग कायद्याच्या चौकटीतून बघता त्यांना सोडता येईल का? असा प्रश्न सावंत यांनी केला. खासदार सावंत यांनी यावेळी माणसं विकाऊ झाल्याचा आरोप करत गद्दारी केल्याची टीका केली.

सचिन अहिर यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून विधानपरिषद उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केला. सहा खासदारांच्या फुटीनंतर आठ दिवसातच उद्धव ठाकरेंनी दुसरा धक्का बसला आहे. अहिर यांच्या फुटीनंतर ठाकरे गटाकडून विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी याप्रकरणी विविध प्रश्न उपस्थित केले आहेत. यांना बंडखोर कसं म्हणायचं? हे विकाऊ झाले, तुम्ही देशाच्या संविधानाला मानता का नाही? देशाच्या संविधानातील शेड्युल १० नुसार, एकटा माणूस कसा जाऊ शकतो?”, असा सवाल खासदार सावंत यांनी माध्यमांशी बोलताना उपस्थित केला. स्वेच्छेने पक्ष सोडणारे अपात्र व्हायला हवेत, असा मुद्दाही सावंत यांनी मांडला. कायद्याचे आणि मराठीचे विद्वान अध्यक्षांनी आमच्यावेळी काय केलं होतं? ते आता काय करतील? असे म्हणत नागरिकांनी देखील याचा विचार करण्याची गरज असल्याचे सावंत म्हणाले.१) लोकांनी विचार करायला हवा की हे संविधानाला कसे मानत नाहीत. २) एकटा माणूस कसा जाऊ शकतो? ३) तुम्ही पक्ष शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) लिहिता ना? मग संविधानातील शेड्युल १० चे काय? ४) मराठी प्रमाणेच संविधान तरतुदींमध्ये विद्वान असलेले अध्यक्ष हे देखील योग्यच म्हणणार का?

# 'गोंडगावच्या चिमुकलीला अद्याप न्याय का नाही?'

## नसरापूर प्रकरणातील जलद निकालाचे स्वागत

जन सम्राट टाईम्स

**भडगाव :** गोंडगाव येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व हत्या प्रकरण पुन्हा एकदा ऐरणीवर आले असून, भारतीय जनता पक्षाने या प्रकरणात स्थानिक आमदारांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भडगाव येथील अटल भाजप कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत भाजप पदाधिकाऱ्यांनी पीडितेला अद्याप न्याय मिळालेला नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत, न्यायप्रक्रियेला गती न मिळाल्यास तालुकाभर व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशारा दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना भाजप नेते अनिल वाघ यांनी नसरापूर येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व हत्या प्रकरणात विशेष न्यायालयाने अवघ्या ६० दिवसांत दोषीला फाशीची शिक्षा सुनावल्याबद्दल न्यायव्यवस्था आणि महायुती सरकारचे अभिनंदन केले. अशा जलद आणि कठोर निर्णयांमुळे समाजातील विकृत प्रवृत्तींवर प्रभावी प्रतिबंध निर्माण होतो आणि पीडित कुटुंबांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होतो, असे त्यांनी सांगितले. यावेळी गोंडगाव प्रकरणाचा उल्लेख करत अनिल वाघ यांनी स्थानिक आमदारांवर निष्क्रियतेचा आरोप केला. त्यांनी सांगितले की, २०२३ मध्ये गोंडगाव येथे सात वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर भडगाव तालुका आणि जळगाव जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली होती. सर्वपक्षीय मोर्चे, व्यापाऱ्यांचा स्वयंस्फूर्त बंद आणि विविध सामाजिक संघटनांच्या आंदोलनांमुळे या प्रकरणाने राज्याचे लक्ष वेधून घेतले होते. भाजपच्या म्हणण्यानुसार, त्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणासाठी जलदगती न्यायालय स्थापन



करण्याचे तसेच विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, तीन वर्षांनंतरही पीडित कुटुंबाला न्याय मिळालेला नसल्याची खंत व्यक्त करत, या प्रकरणाचा प्रभावी पाठपुरावा करण्यात स्थानिक आमदार अपयशी ठरल्याचा आरोप भाजपने केला. पत्रकार परिषदेत भाजपने शासन आणि संबंधित यंत्रणांसमोर काही प्रश्नही उपस्थित केले. गोंडगाव प्रकरणाची सुनावणी प्रत्यक्षात जलदगती न्यायालयात सुरू आहे का? विशेष सरकारी वकील म्हणून ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती झाली आहे का? की जनतेची दिशाभूल करण्यासाठी केवळ घोषणा करण्यात आल्या? तसेच या प्रकरणात स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रभावी पाठपुरावा का केला नाही, असा सवालही उपस्थित करण्यात आला. भाप पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणात कोणत्याही प्रकारचे राजकारण करण्याचा पक्षाचा उद्देश नसून, पीडितेला न्याय मिळणे हीच त्यांची भूमिका आहे. प्रशासनाने आणि न्याययंत्रणेने या खटल्याची सुनावणी गतीने पूर्ण करून दोषींना कठोर शिक्षा मिळवून द्यावी. अन्यथा भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली भडगाव तालुक्यात व्यापक आणि तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. या पत्रकार परिषदेला भाजपचे नेते अनिल वाघ, तालुकाध्यक्ष विनोद देविदास नेरकर, सोमनाथ पाटील, नगरसेवक सचिन चोरडिया, योजना पाटील, हर्षल पाटील, निलेश पाटील, अनिल पाटील, सुशीलाताई पाटील, शहराध्यक्षा योगिता वाघ, किरण शिंपी, शुभम सुराणा, आबा महाजन, नगरसेवक मुरलीधर मोरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चिमुकलीवर अत्याचार करून निर्घृण हत्या

जलद आणि कठोर निर्णयांमुळे समाजातील विकृत प्रवृत्तींवर प्रभावी प्रतिबंध निर्माण होतो आणि पीडित कुटुंबांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होतो, असे त्यांनी सांगितले. यावेळी गोंडगाव प्रकरणाचा उल्लेख करत अनिल वाघ यांनी स्थानिक आमदारांवर निष्क्रियतेचा आरोप केला. त्यांनी सांगितले की, २०२३ मध्ये गोंडगाव येथे सात वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती.

# कजगावजवळ मध्यरात्री भीषण अपघात!

## गॅसवाहू आयशरची ट्रॅक्टरला जोरदार धडक

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी :** आषाढी वारी आटोपून परतीच्या प्रवासाला निघालेल्या वारकरी भाविकांवर मध्यरात्री काळाने घाला घातला. भडगाव तालुक्यातील कजगावजवळ भरधाव गॅसवाहू आयशरने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रॅक्टरला जोरदार धडक दिल्याने महिंदळे येथील दिनकर शेनपडू भदाणे (वय ५५) यांचा जागीच मृत्यू झाला. या भीषण अपघातात दोन महिलांसह एकूण १५ जण जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चाळीसगाव तालुक्यातील बेलदारवाडी येथून ज्ञानेश्वर माऊलींची आषाढी वारीची दिंडी मार्गस्थ करून काही वारकरी




भाविक आपल्या गावाकडे परतत होते. दरम्यान, शनिवारी मध्यरात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास कजगाव परिसरात त्यांच्या ट्रॅक्टरमधील डिझेल संपल्याने वाहन रस्त्याच्या कडेला उभे करण्यात आले होते. काही भाविक ट्रॉलीत विश्रांती घेत असतानाच मागून भरधाव वेगाने येणाऱ्या गॅस वाहतूक करणाऱ्या आयशर वाहनाने ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. भीषण होता की ट्रॉलीतील भाविकांना सावरण्याचीही संधी मिळाली नाही. या अपघातात ट्रॉलीत झोपलेल्या दिनकर भदाणे यांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर भाविक गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने स्थानिक नागरिकांच्या मदतीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर विशेष उपचार सुरू आहेत. दरवर्षी महिंदळे व परिसरातील शंभर ते दीडशे वारकरी बेलदारवाडी येथून ज्ञानेश्वर माऊलींच्या दिंडीत सहभागी होतात. काही भाविक दिंडीला निरोप देऊन परत गावाकडे येतात. यंदाही ही परंपरा कायम ठेवण्यात आली होती.झालेल्या या भीषण अपघाताने वारकरी समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत दिनकर भदाणे हे अत्यंत धार्मिक आणि सेवाभावी स्वभावाचे म्हणून परिसरात परिचित होते. विशेष म्हणजे त्यांचे दोन्ही पुत्र देशसेवेत कार्यरत असून त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुलांचा परिवार आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# नशिराबाद नगरपरिषदेतील गैरव्यवहारांची चौकशी!

## कामगार संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन




जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** नशिराबाद नगरपरिषदेतील विविध कथित अनियमितता, कामगारांच्या समस्या आणि मुख्याधिकारी आर. आर. सोनवणे यांच्या बदलीची मागणी करत जळगाव जिल्हा जनरल कामगार सेनेचे अध्यक्ष प्रदीप साळी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, मुख्याधिकारी आर. आर. सोनवणे हे गेल्या पाच वर्षांपासून नशिराबाद नगरपरिषदेत एकाच पदावर कार्यरत असून, शासनाच्या बदली धोरणानुसार त्यांची बदली होणे अपेक्षित असतानाही ती झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, घनकचरा व्यवस्थापन आणि साफसफाईच्या कामांमध्ये कंत्राटदारांकडून अनियमितता होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. सफाई कामगारांना आवश्यक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून दिले जात नसल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय, भविष्य निर्वाह निधी (PF) तसेच इतर कपातींबाबत कामगारांना आवश्यक माहिती दिली जात नसल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे. कामगार संघटनेने दिव्यांगांच्या कल्याणासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीच्या खर्चाबाबतही प्रश्न उपस्थित केला असून, हा निधी नियमानुसार खर्च होत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. या सर्व कथित गैरप्रकारांची जिल्हाधिकारी स्तरावर सखोल चौकशी करण्यात यावी, मुख्याधिकारी आर. आर. सोनवणे यांची तातडीने बदली करण्यात यावी आणि चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जळगाव जिल्हा जनरल कामगार सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

### कामगारांना आवश्यक माहिती

सफाई कामगारांना आवश्यक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून दिले जात नसल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय, भविष्य निर्वाह निधी (PF) तसेच इतर कपातींबाबत कामगारांना आवश्यक माहिती दिली जात नसल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे. कामगार संघटनेने दिव्यांगांच्या कल्याणासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीच्या खर्चाबाबतही प्रश्न उपस्थित केला असून, हा निधी नियमानुसार खर्च होत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# कुटुंब अर्थसहाय्य योजनेचा निधी तात्काळ वितरित करा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी :** धरणगाव तालुक्यातील कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना गेल्या सहा महिन्यांपासून निधी मिळालेला नसल्याने तो तात्काळ वितरित करावा, अशी मागणी अखिल भारतीय मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पी. एम. पाटील यांनी केली आहे. पी. एम. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत अनेक प्रकरणांना मंजुरी देण्यात आली होती.

मात्र, त्यानंतरही धरणगाव तहसील कार्यालयातून सुमारे १२० प्रकरणे निधी वितरणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवूनही गेल्या सहा महिन्यांपासून संबंधित लाभार्थ्यांना आर्थिक मदत मिळालेली नाही. तहसील कार्यालयात चौकशी केल्यानंतर "निधी प्राप्त झालेला नाही" असे सांगितले जात असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही की जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर विलंब होत आहे, याबाबत स्पष्टता करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. पी. एम. पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रकरणातील नेमकी अडचण जाणून घेण्याची भूमिका मांडली आहे.

लाभार्थी सातत्याने पदाधिकारी, पत्रकार आणि संबंधित कार्यालयांकडे निधीबाबत विचारणा करत असून त्यांच्या अडचणी गंभीर असल्याचे त्यांनी सांगितले. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनानंतर संबंधित कुटुंब आर्थिक संकटात सापडते. अशा परिस्थितीत कुटुंब अर्थसहाय्य योजनेचा निधी वेळेत मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

# शाळा भरण्याच्या वेळेत अवजड वाहनांना बंदी घाला; युवा सेनेचे वाहतूक विभागाला निवेदन

जन सम्राट टाईम्स

**नाशिक (प्रतिनिधी):** धुळे शहरातील शाळा आणि महाविद्यालयांच्या वेळेत अवजड वाहनांची वाढती वर्दळ विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरत असल्याचा आरोप करत युवा सेनेने वाहतूक विभागाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष योगेश मराठे यांच्या नेतृत्वाखाली वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. आठ दिवसांच्या आत ठोस उपाययोजना न झाल्यास 'शिवसेना स्टाईल' आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. युवा सेनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरात रात्री ८ ते सकाळी ९ वाजेपर्यंत अवजड वाहनांना प्रवेशबंदी लागू असतानाही अनेक भागांत नियमांचे



खुलेआम उल्लंघन होत आहे. विशेषतः सकाळच्या शाळा सुरू होण्याच्या वेळेत शहरातील प्रमुख रस्त्यांवर ट्रक, डंपर आणि इतर अवजड वाहने मोठ्या प्रमाणावर फिरत असल्याने विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. कमलाबाई कन्या शाळा, बाफना शाळा, गल्ली क्रमांक ४, ५ आणि ६, जे. बी. रोड, संपूर्ण पेठ परिसर तसेच साक्री रोडवरील सिंधी कॅम्प परिसरात अवजड वाहनांचा वावर मोठ्या प्रमाणात असल्याचे युवा सेनेने निदर्शनास आणून दिले. याच मार्गांवर यापूर्वीही अपघात होऊन अनेक विद्यार्थ्यांचा बळी गेल्याची आठवण करून देत, एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होते आणि काही दिवसांत पुन्हा परिस्थिती पूर्ववत होते, अशी टीकाही करण्यात आली. विद्यार्थी, पालक आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत शहरात वाहतूक नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याची मागणी युवा सेनेने केली आहे. निवेदनात सकाळी ९ वाजेपूर्वी शहरात कोणत्याही अवजड वाहनाला प्रवेश देऊ नये, शाळा व महाविद्यालये सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा तसेच तहसील कार्यालय चौकात कायमस्वरूपी वाहतूक पोलिसाची नियुक्ती करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रश्न उपस्थित केला की, शहरात लागू असलेली प्रवेशबंदी केवळ कागदोपत्री आहे का? नियम असतानाही अवजड वाहने शहरात कशी प्रवेश करतात, याची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. प्रशासनाने वेळेत कारवाई न केल्यास अवजड वाहनांच्या विरोधात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा युवा सेनेने दिला हे निवेदन युवा सेनेचे जिल्हाप्रमुख मनोज मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष योगेश मराठे यांच्या नेतृत्वात देण्यात आले.

# 'ज्याच्या चरणी लाभली पंढरीची माती...'

जन सम्राट टाईम्स

**पाळधी ( धरणगाव)। प्रतिनिधी :** आषाढी वारी पूर्ण करून पंढरपूरहून सुखरूप परतलेल्या वारकरी भाविकांचे जळगाव रेल्वे स्थानकावर उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात स्वागत करण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य तथा उद्योजक अनिल कासट यांच्या पुढाकारातून आयोजित या स्वागत सोहळ्यात जि.प. सदस्य प्रतापराव पाटील यांच्यासह वारीत सहभागी झालेल्या शेकडो वारकऱ्यांचा पुष्पहार घालून आणि टाळ्यांच्या कडकडाटात सत्कार करण्यात आला. यंदा सलग तिसऱ्या वर्षी जीपीएस मित्रपरिवार आणि विकी बाबा युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने रेल्वे आणि एसटीच्या माध्यमातून




हजारो वारकरी पंढरपूर वारीसाठी रवाना झाले होते. संपूर्ण यात्रेचे नियोजन राज्याचे मंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जि.प. सदस्य प्रतापराव पाटील यांनी केले होते. त्यांच्या नियोजनामुळे सर्व वारकरी सुरक्षित, शिस्तबद्ध आणि आनंददायी वातावरणात वारी पूर्ण करून सुखरूप परतल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. जळगाव रेल्वे स्थानकावर वारकरी दाखल होताच उद्योजक अनिल कासट यांनी मित्रपरिवारासह त्यांचे पुष्पगुच्छ, हार आणि जयघोषात स्वागत केले. "विठ्ठल... विठ्ठल..."च्या गजराने परिसर भक्तिमय झाला होता. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर पंढरीच्या दर्शनाचे समाधान आणि स्वागतासाठी उपस्थितांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत होता. यावेळी बोलताना जि.प. सदस्य प्रतापराव पाटील भावूक झाले. त्यांनी सांगितले की, "वारी ही केवळ यात्रा नसून ती संस्कार, शिस्त, सेवा आणि भक्तीचा महाउत्सव आहे. सर्व वारकऱ्यांनी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने दोन दिवस विठ्ठल नामस्मरण, भजन, कीर्तन आणि हरिनामाच्या गजरात वारी पूर्ण केली. पांडुरंगाच्या कृपेने सर्वजण सुखरूप परतले, हीच सर्वात मोठी आनंदाची बाब आहे. या यशस्वी आयोजनात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकऱ्यांचे मनःपूर्वक आभार." उपस्थितांनी प्रतापराव पाटील यांच्या नियोजन कौशल्याचे कौतुक करत, हजारो वारकऱ्यांची रेल्वे आणि एसटीद्वारे सुरक्षित वाहतूक, निवास आणि इतर सुविधांचे प्रभावी नियोजन केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. या स्वागत व सत्कार सोहळ्यास जीपीएस मित्रपरिवाराचे धनराज कासट, मुकेश भोई, प्रशांत झवर, चंदू पाटील, दिलीप माळी, भूषण महाजन, अनिल महाजन, आबा माळी, कल्पेश कोळी यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी, भक्ती, आनंद आणि समाधानाने भरलेला हा सोहळा

# यूपीएससी तयारीसाठी ७५ हजारांपर्यंत अर्थसाहाय्य!

## पात्र उमेदवारांनी १७ जुलैपर्यंत अर्ज करावेत

जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार | प्रतिनिधी:** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) नागरी सेवा (मुख्य) परीक्षा आणि मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील पात्र उमेदवारांना प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे. सन २०२६ मधील यूपीएससी नागरी सेवा (पूर्व) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडून या योजनेसाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले असून, पात्र उमेदवारांनी १७ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे यांनी केले आहे. या योजनेचा लाभ राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तसेच 'अमृत'च्या लक्षित गटातील उमेदवारांना मिळणार आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक आधार मिळावा आणि अधिकाधिक विद्यार्थी केंद्रीय नागरी सेवांमध्ये यशस्वी व्हावेत, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. योजनेअंतर्गत पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी ५० हजार रुपये आणि मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी २५ हजार रुपये असे एकूण ७५ हजार रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य दिले जाणार आहे. या निधीचा उपयोग अभ्यास साहित्य, मार्गदर्शन वर्ग, निवास, प्रवास आणि इतर आवश्यक शैक्षणिक खर्चासाठी करता येणार आहे. 'अमृत'च्या लक्षित गटामध्ये ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पाटील, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर,



नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुंथर, गुजराती, जाट, हिंदू नेपाळी, भूमिहार, लोहाणा, कानबी आदी समाजांतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील उमेदवारांचा समावेश करण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांनी mahaamrut.org.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावा. अर्ज भरण्यापूर्वी संकेतस्थळावरील पात्रता, अटी, आवश्यक कागदपत्रे आणि इतर सूचना काळजीपूर्वक वाचूनच अर्ज सादर करावा. अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत १७ जुलै २०२६ असून, त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. योजनेसंदर्भातील सर्व अद्ययावत माहिती, पात्रता निकष, निवड प्रक्रिया आणि पुढील सूचना या केवळ 'अमृत'च्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अधिक माहितीसाठी किंवा ऑनलाइन अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शन हवे असल्यास जिल्हा व्यवस्थापक योगेश अहिरे, जिल्हा अमृत कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय (नगरपालिका विभाग), नंदुरबार येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यूपीएससी मुख्य परीक्षेची तयारी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी ही योजना मोठा आर्थिक आधार ठरणार असून, पात्र उमेदवारांनी विहित मुदतीत अर्ज करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# प्रा. डॉ. सुनील नेवे यांचा ब्रिटिश संसदेचा सखोल अभ्यास

## हाऊस ऑफ कॉमन्स व हाऊस ऑफ लॉर्ड्सच्या कार्यपद्धतीचा घेतला प्रत्यक्ष अनुभव

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी:** इंग्लंड अभ्यासदौऱ्यावर असलेल्या भालोद येथील कला व विज्ञान महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनील नेवे यांनी लंडन येथील ऐतिहासिक पॅलेस ऑफ वेस्टमिन्स्टर (यूके संसद) येथे दिवसभर अभ्यासभेट देत ब्रिटिश संसदीय लोकशाहीचा सखोल अभ्यास केला. या भेटीदरम्यान त्यांनी हाऊस ऑफ कॉमन्स आणि हाऊस ऑफ लॉर्ड्स या दोन्ही सभागृहांच्या कार्यपद्धती, अधिकार, संसदीय परंपरा, विधिनिर्मिती प्रक्रिया आणि लोकशाहीतील भूमिकेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. अभ्यासभेटीत प्रा. डॉ. नेवे यांनी ब्रिटिश संसदेचा जवळपास हजार वर्षांचा इतिहास, मॅग्ना कार्टापासून विकसित झालेली संसदीय परंपरा, संसदीय समित्यांची रचना, विरोधी पक्षाची भूमिका, संसदीय शिस्त, ऐतिहासिक वास्तुकला, संसदीय ग्रंथालय आणि विविध ऐतिहासिक दालनांचा बारकाईने अभ्यास केला. हाऊस ऑफ कॉमन्स हे ब्रिटनमधील लोकप्रतिनिधींचे प्रमुख सभागृह असून येथे जनतेने थेट निवडून दिलेले



खासदार देशाचे प्रतिनिधित्व करतात. सरकारची जबाबदारी निश्चित करणे, प्रश्नोत्तराचा तास, अर्थसंकल्पावर चर्चा, कायदे मंजूर करणे आणि सरकारवर नियंत्रण ठेवणे यांसारखी महत्त्वाची कामे या सभागृहातून पार पडतात. तर हाऊस ऑफ लॉर्ड्स हे ब्रिटनचे वरिष्ठ सभागृह असून येथे विधेयकांचे सखोल परीक्षण, तज्ज्ञांकडून चर्चा, घटनात्मक विषयांवरील विचारमंथन आणि कायद्यांचे पुनरावलोकन केले जाते. या सभागृहातील ऐतिहासिक राजसिंहासन, संसदीय परंपरा आणि राज्य उद्घाटन सोहळ्याशी संबंधित माहितीही त्यांच्या अभ्यासाचा महत्त्वाचा भाग ठरली. यावेळी प्रा. डॉ. नेवे यांनी भारतीय आणि ब्रिटिश संसदीय व्यवस्थेतील महत्त्वाच्या साम्य व भिन्नतांचाही अभ्यास केला. त्यांनी सांगितले की, भारताने ब्रिटिश संसदीय प्रणालीचा स्वीकार केला असला तरी भारतीय लोकशाहीने लिखित संविधान, सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, स्वतंत्र न्यायपालिका आणि संघराज्य व्यवस्था स्वीकारून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी विशेषतः ब्रिटनमधील 'शॅडो कॅबिनेट' (छाया मंत्रिमंडळ) या संकल्पनेचा उल्लेख केला. ब्रिटनमध्ये विरोधी पक्ष सरकारच्या प्रत्येक मंत्र्यांवर लक्ष ठेवण्यासाठी समांतर 'शॅडो मंत्री' नियुक्त करतो.

### मंत्रिमंडळ तातडीने सत्तेची सूत्रे स्वीकारण्यास तयार

सरकार बदलल्यास हेच छाया मंत्रिमंडळ तातडीने सत्तेची सूत्रे स्वीकारण्यास तयार असते. भारतात विरोधी पक्षाला घटनात्मक मान्यता असली तरी अशा प्रकारची औपचारिक व्यवस्था अस्तित्वात नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रा. डॉ. नेवे यांनी भारत आणि ब्रिटनमधील घटनात्मक व्यवस्थेतील मूलभूत फरकही अधोरेखित केला. भारतात संविधान सर्वोच्च असून संसदेने केलेला कोणताही कायदा संविधानविरोधी असल्यास सर्वोच्च न्यायालय तो रद्द करू शकते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306